# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दिनांक ०४/०५/२०१७

काल दिनांक ०३ मे २०१७ रोजी भामरागड तालुक्यातील पोमके कोठी हद्दीतील कोपर्शी जंगलात नक्षलविरुध्द झालेल्या चकमकी दरम्यान जखमी जवानांना मदत करण्यासाठी गेलेल्या पोलीस पार्टीने जखमी जवानांना उपचारासाठी पुढे पाठवून, भामरागडकडे परत येत असतांना हेमलकसा ते कारमपल्ली दरम्यान पोलीस पार्टीच्या MPV वाहनांवर नक्षलवादयांनी भुसुरूंग स्फोट घडवून आणला. भुसुरूंग स्फोटानंतरही पोलीस जवानांनी नक्षलवादयांना चोख प्रतिउत्तर दिले, यामध्ये भुसुरूंग स्फोटामध्ये अडकलेल्या गाडीतील जवानांच्या संरक्षणासाठी त्याच्या समोरील MPV वाहनांतील पोलीस जवानांनी धाव घेतली व नक्षल्यांना चोख प्रतित्तर दिले. यामुळे नक्षल्यांनी घटनास्थळावरुन पळ काढला. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड व त्यांच्या पथकाने अभियानातील सर्व जवानांना सुरक्षितरित्या भामरागड येथे आणले. भुसुरूंग स्फोटामध्ये अडकलेल्या MPV वाहनातील १३ जवान जखमी झाले. सदर जखमी जवानांवर भामरागड येथे उपचार सुरु असतांना गडचिरोली पोलीस दलाचे शुर जवान पोशि/५२१० सुरेश लिंगा तेलामी, रा. कृष्णार, ता. भामरागड, जि. गडचिरोली हे शहिद झाले. आज दिनांक ०४ मे २०१७ रोजी शहिद जवानाच्या पार्थिवावर पोलिस मुख्यालय गडचिरोली येथे मानवंदना देण्यात आली. सायंकाळी ६ वाजेदरम्यान त्यांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शोकसलामी देऊन बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडण्यात आल्या.

यावेळी आदिवासी विकास राज्यमंत्री म. रा. मुंबई तथा जिल्हयाचे पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम, जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता भांडेकर, अतिरीक्त

ोलीस महासंचालक श्री. कनकरत्नम, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी तसेच सिआरपीएफचे वरिष्ठ अधिकारी यांनी शहीद जवान सुरेश तेलामी यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्याचबरोबर शहीद जवान सुरेश तेलामी यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले व सलामी दिली.

सदर घटनेमध्ये जखमी झालेल्या इतर पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सर्वोत्तम उपचाराकरीता नागपुर येथील दवाखान्यामध्ये भरती करण्यात आले आहे.


शहिद पो.शि./५२१० सुरेश लिंगा तेलामी







